RNI No. MAHBIL /2009/37831

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार–ब

वर्ष ७, अंक ९४(२)] बुधवार, ऑगस्ट ४, २०२१/श्रावण १३, शके १९४३ [पृष्ठे ३, किंमत : रुपये ९.००

**असाधारण क्रमांक २१५**

**प्राधिकृत प्रकाशन**

**महाराष्ट्र शासनाने महाराष्ट्र अधिनियमांन्वये तयार केलेले (भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त), नियम व आदेश.**

### आदिवासी विकास विभाग

मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरू चौक, मंत्रालय,
मुंबई ४०० ०३२, दिनांक २ ऑगस्ट, २०२१.

**अधिसूचना**

**महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५.**

क्रमांक लोसेअ. २२१८/प्र. क्र. ३०/कार्या. ५.—ज्याअर्थी प्रशासकीय विभाग म्हणून आदिवासी विकास विभागाने महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ (सन २०१५ चा महा. अधिनियम हमी क्र. ३१) मधील कलम ३ च्या उपकलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून पात्र व्यक्तींना पुरविण्यात येणाऱ्या लोकसेवा त्यांच्या क्षेत्रिय कार्यालय, विहित मुदतीसह व त्यासाठी प्राधिकृत केलेले अधिकारी, प्रथम अपीलीय प्राधिकारी आणि द्वितीय अपील प्राधिकारी यांच्यासह क्र. आविवि २०१५/प्र. क्र. ३/का-१६, दिनांक ३१ डिसेंबर २०१५ (यानंतर 'या अधिसूचना' म्हणून संबोधित) अन्वये अधिसूचित केलेल्या आहेत ;

आणि ज्याअर्थी महाराष्ट्र शासनाच्या आदिवासी विकास विभागाद्वारा अनुसूचित जमातीतील उच्च शिक्षण घेणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांना कोणत्याही शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही अशा विद्यार्थ्यांना अन्न, राहण्याची व्यवस्था, निर्वाह आणि शैक्षणिक साहित्य यासाठी पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजने अंतर्गत आर्थिक सहाय्य देण्याच्या सेवेला अधिसूचित करण्याचा निर्णय घेण्यात आल्याने या कायद्याच्या उद्देशाने या लोकसेवेसाठी नियुक्त केलेले प्राधिकारी, प्रथम अपीलीय प्राधिकारी, द्वितीय अपीलीय प्राधिकारी आणि त्यासाठी विहित केलेली मुदत अधिसूचित करीत आहे ;

त्याअर्थी महाराष्ट्र लोकसेवा हक्क अधिनियम, २०१५ (सन २०१५ चा महा. अधिनियम हमी क्र. ३१) मधील कलम ३ च्या उपकलम (१) अन्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आदिवासी विकास विभाग, महाराष्ट्र शासन याद्वारे अनुसूचित जमातीतील उच्च शिक्षण घेणाऱ्या ज्या विद्यार्थ्यांना कोणत्याही शासकीय वसतिगृहात प्रवेश मिळालेला नाही अशा विद्यार्थ्यांना अन्न, राहण्याची व्यवस्था, निर्वाह आणि शैक्षणिक साहित्य यासाठी पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजने अंतर्गत आर्थिक सहाय्य देण्याच्या सेवेला अधिसूचित करीत आहे. यासाठी प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प हे प्राधिकृत अधिकारी, अपर आयुक्त आदिवासी विकास हे, प्रथम

अपीलीय प्राधिकारी म्हणून व आयुक्त, आदिवासी विकास हे द्वितीय अपीलीय प्राधिकारी म्हणून राहतील आणि या कायद्याच्या उद्देशाने सदर सेवा पुरविण्यासाठी साठ दिवसांची मुदत राहील. या उद्देशाने 'या अधिसूचनेत' खालीलप्रमाणे सुधारणा करीत आहे :—

या अधिसूचनेमध्ये, अनुसूचीमधील अनु. क्र. ६ नंतर, खालील नोंद समाविष्ट केली जाईल,—

| | | | | |
|---|---|---|---|---|
| "७ पंडित दीनदयाल उपाध्याय स्वयम् योजनेंतर्गत उच्च शिक्षण घेणाऱ्या आणि शासकीय वसतिगृहांमध्ये प्रवेश न मिळालेल्या अनुसूचित जमातीतील विद्यार्थ्यांना अन्न, राहण्याची व्यवस्था, निर्वाह आणि शैक्षणिक साहित्य यासाठी आर्थिक सहाय्य. | सर्व दृष्टीने परिपूर्ण अर्ज प्राप्त झाल्यानंतर साठ दिवसांमध्ये | प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प. | अपर आयुक्त, आदिवासी विकास | आयुक्त आदिवासी विकास.". |

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**ल. गो. ढोके,**
शासनाचे सह सचिव.

## TRIBAL DEVELOPMENT DEPARTMENT

Madam Cama Marg, Hutatma Rajguru Chowk, Mantralaya,
Mumbai 400 032, dated 2nd August 2021.

*NOTIFICATION*

MAHARASHTRA RIGHT TO PUBLIC SERVICES ACT, 2015.

No. PSA. 2218/C.R. 30/Desk-5.—Whereas the Tribal Development Department being the concerned Administrative Department has, *vide* Government Notification, Tribal Development Department, No. TDD-2015/C.R.No.3/D-16, dated the 31st December 2015 (hereinafter referred to as "the said Notification") issued in exercise of the powers conferred by sub-section *(1)* of section 3 of the Maharashtra Right to Public Services Act, 2015 (Mah. XXXI of 2015), notified the public services to be rendered to the eligible persons through its field offices, along with the stipulated time limit for providing such public services, the Designated Officers, First Appellate Authority and Second Appellate Authority as specified in the Schedule appended therefor for the purposes of the said Act ;

And whereas, the Tribal Development Department of the Government of Maharashtra considers it expedient to notify the service of giving financial support for food, accommodation, subsistence and educational materials to students belonging to the Scheduled Tribes pursuing higher education and are not admitted in any Government Hostels under the Pandit Deendayal Upadhyay Swayam Yojana as a public service alongwith Designated Officers, First Appellate Authority, Second Appellate Authority and stipulated time limit therefor for the purposes of the said Act ;

Now, therefore, in exercise of the powers conferred by sub-section (*1*) of section 3 of Maharashtra Right to Public Services Act, 2015 (Mah. XXXI of 2015), the Tribal Development Department of the Government of Maharashtra hereby notifies the service of giving financial support for food, accommodation, subsistence and educational materials to students belonging to the Scheduled Tribes pursuing higher education and are not admitted in any Government Hostels under the Pandit Deendayal Upadhyay Swayam Yojana as a public service, Project Officer, Integrated Tribal Development Project as a Designated officer, the Additional Tribal Commissioner, as a First Appellate Authority, the Commissioner, Tribal Development as a Second Appellate Authority and time limit of sixty days providing the said service for the purposes of the said Act; and for that purpose hereby amends the said Notification, as follows :—

In the said Notification, in *SCHEDULE,* after entry 6, the following entry shall be added, namely :—

| | | | | | |
|---|---|---|---|---|---|
| "7 | Financial support for food, accommodation, subsistence and educational materials to students belonging to the Scheduled Tribes pursuing higher education and not admitted in Government hostels under the Pandit Deendayal Upadhyay Swayam Yojana. | Sixty days after receiving application complete in all respects. | Project officer, Integrated Tribal Development Project. | Additional Tribal Commissioner, Tribal Development | Commissioner, Tribal Development.". |

By order and in the name of the Governor of Maharashtra,

L. G. DHOKE,
Joint Secretary to Government.

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.